// सा विद्या या विमुक्तये //
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपुरी, नांदेड-४३१ ६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)
Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
e-mail : affi.srtmun@gmail.com

गुणवंत मुलांमुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....

## :: परिपत्रक ::

संदर्भ :- १. मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि. ०४ ऑक्टोंबर २०१८.

२. मा. सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे दि.०१.१२. २०१८ रोजीचे पत्र.

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भाकिंत शासन निर्णय क्र. ०१ नुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थी परदेशातील उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याकरीता राज्य शासनाने ''गुणवंत मुलांमुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती''ही योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबवियाचा निर्णय घेतला आहे.

या शिष्यवृत्तीसाठी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावरुन (www.dtemahatrashtra.gov.in/foreignsholarship2018) ऑन-लाईन अर्ज भरण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. परंतु या शिष्यवृत्तीसाठी अल्प प्रतिसाद मिळाल्याचे व या शिष्यवृत्तीसाठी ऑन-लाईन अर्ज दाखल करण्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पर्यत वाढविण्यात आल्याचे संदर्भाकिंत पत्र क्र. ०२ नुसार मा. सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी कळविले आहे.

तेंव्हा, उपरोक्त संदर्भाकिंत शासन निर्णय क्र. ०१ मधील तरतुदीनुसार आपल्या महाविद्यालयातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थी परदेशातील उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याची काळजी घ्यावी व लाभधारक विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीसाठी ऑन-लाईन अर्ज दाखल करण्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत वाढविण्यात आल्याचे संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करावी.

सदरचे परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात आले आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड-४३१६०६. )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न-०३/२०१८-२०१९/ 2296 )(
दिनांक :- २१.१२.२०१८. )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.



Scanned by CamScanner